जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 SEP 2024
लोकमत

# सौर उपकरण, गॅस-सेन्सर संशोधनास पेटंट

## शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील डॉ. सागर दा. डेळेकर (रसायनशास्त्र अधिविभाग), डॉ. प्रमोद अ. कोयले (स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी), प्रा. विजय घोडके (यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी), प्रा. प्रकाश पवार (यशवंतराव पाटील सायन्स महाविद्यालय सोळांकूर), डॉ. प्रशांत पाटील (तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ) व डॉ. सतीश पाटील (कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी) यांनी नॅनो संमिश्रे आधारित सौर उपकरण, बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणे तसेच वायुपदार्थ संवेदन (गॅस-सेन्सर) याविषयी संशोधन केले असून, या संशोधनासाठी त्यांना २ जर्मन व १ यूके पेटंट प्राप्त झाली.

डॉ. डेळेकर म्हणाले की, आजच्या ग्लोबल वॉर्मिंगच्या समस्या व सिलिकॉनआधारित सौर उपकरणाच्या उच्च किमतीच्या संदर्भात, विविध शास्त्रज्ञ सध्या उपयुक्त पर्याय विकसित करण्यासाठी कार्यरत आहेत. सौरऊर्जेचा वापर करण्याच्या विविध धोरणांपैकी, नॅनोसंमिश्रे आधारित सौर यंत्रणा ही एक उपयोगी व आकर्षक बाब आहे. या संदर्भात संशोधक चमू सौरऊर्जेच्या रूपांतरणासाठी धातू ऑक्साइड-आधारित नॅनोसंमिश्रे विकसित करण्यासाठी संशोधन करीत आहे. दैनंदिन जीवनात बॅक्टेरिया, विषाणू, बुरशी, आदी सूक्ष्म जीवजंतू सर्वत्र आढळतात, जे वातावरणात दुर्गंधी व अस्वच्छता पसरण्याचा कारणीभूत ठरतात. असे सूक्ष्म जीवजंतू मानवी शरीरामध्ये प्रवेश करून अनेक संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता खूप असते. किंबहुना मधुमेही, बीपी रुग्णांना अशा जीवजंतूंचा संसर्ग लवकर होऊन त्यांची प्रतिकारक्षमता दिवसेंदिवस कमी होत जाते. म्हणून या सूक्ष्म जीवजंतूंचा प्रसार व पुनरुत्पादन रोखण्यासाठी प्रा. डेळेकर व त्यांचा संशोधक विद्यार्थी प्रा. व्ही. एस. घोडके यांनी धातू ऑक्साईड नॅनोसंमिश्रे-आधारित प्रतिजैविक घटक बनविले आहेत. ज्यांचा उपयोग जिवाणूजन्य संसर्ग व संक्रमणाचा धोका टाळण्यासाठी केला जाऊ शकतो. एकंदरीत धातू ऑक्साइड-आधारित नॅनोसंमिश्रे वापरून फक्त ऊर्जासंबंधित नाही, तर वैद्यकीय क्षेत्रातही प्रभावीपणे विकास केला जाऊ शकतो, या चमूने अमोनिया वायू संवेदनासाठी अशाच नॅनो-संमिश्रे आधारित नवीन तंत्रज्ञान विकसित केले असून, त्यास यूके पेटंट मंजूर केले. हे प्रगत उपकरण अतिसंवेदनशील आहे; ज्यामुळे ते अमोनियाच्या अगदी लहान प्रमाणावरही देखरेख ठेवू शकतात.

# कौशल्य-आधारित शिक्षण काळाची गरज

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्पर्धेच्या काळात कौशल्यावर आधारित शिक्षणावर भर देणे काळाची गरज असल्याचे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागात आयोजित शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रमात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना फक्त अभ्यासक्रम शिकवण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहावे. प्रा. शिर्के यांनी विभागातील निवृत्त प्राध्यापक एम. बी. डोंगरे यांनी विद्यार्थिनींच्या वसतिगृहाच्या बांधकामासाठी साडे सहा लाख रुपयांची देणगी दिल्याचे सांगून या विभागाला दातृत्वाचा वारसा असल्याचे नमूद केले.



**कोल्हापूर : विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागात आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे आदी.**

याप्रसंगी प्रा. डॉ. बी. व्ही. खासबारदार यांनी पुरस्कृत केलेली निवृत्ती शिक्षकाची शिष्यवृत्ती व प्रा. डॉ. सी. एच. भोसले यांनी आईच्या स्मृतीप्रित्यर्थ पुरस्कृत केलेली शिष्यवृत्ती सुबहान जमादार, प्रियांका पाटील व संपदा चव्हाण विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आली. माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. के. वाय. राजपुरे यांनी मनोगत व्यक्त केले. विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर.एस. व्हटकर, डी. एच. भादले, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. एस. पी. दास, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. एस. एस. पाटील, डॉ. एम. आर. वायकर, डॉ. ए. आर. पाटील, उमेश भोसले, अभिजित लिंग्रस उपस्थित होते. उपकुलसचिव बी. एम. नाळे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन नेहा शहा, साक्षी काळे यांनी केले. डॉ. एन. एल. तरवाळ यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 SEP 2024
पुढारी



कोल्हापूर : शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, सारथी यांच्यातील सामंजस्य कराप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, किरण कुलकर्णी, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अवनिश पाटील आदी.

# शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र - सारथी यांच्यात सामंजस्य करार

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे व शिवाजी विद्यापीठ यांच्यामध्ये सरसेनापती हंबीरराव मोहिते सारथी मोडी लिपी प्रशिक्षण प्रकल्प राबविण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, सामंजस्य करार समाज व संशोधक विद्यार्थी वर्गासाठी महत्वपूर्ण आहे. राज्यातील मराठा, कुणबी समाजाच्या लक्ष्य गटाकडून हस्तलिखित व दस्तऐवज अभ्यासन्यास उपयुक्त ठरेल. या प्रसंगी छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे उपकेंद्र कोल्हापूरतर्फे व्यवस्थापकीय संचालक किरण कुलकर्णी, सारथी उपकेंद्र, कोल्हापूर येथील संशोधन अधिकारी नयन गुरव, प्रकल्प अधिकारी दीपक पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 SEP 2024
पुढारी

# संख्याशास्त्राशिवाय विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन अशक्य : डॉ. महाडिक

**कोल्हापूर :** कोणत्याही क्षेत्रातील संशोधनात्मक बांधणीसाठी संख्याशास्त्रातील मूलभूत संकल्पना वापरणे अपरिहार्य झाले आहे. माहिती संकलित करताना व अनुमान मांडताना या संकल्पना खूप गरजेच्या असल्याचे मत शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस. बी. महाडिक यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित व्याख्यानामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. व्याख्यानात त्यांनी संख्याशास्त्रातील अनेक मूलभूत संकल्पना व त्यांचे उपयोग यावर प्रकाश टाकला. संख्याशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. वर्षा शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

0 9 SEP 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ देणार अभ्यासक्रमांची क्रमिक पुस्तके

## विद्यार्थीहिताचे पाऊल; विज्ञान, अभियांत्रिकीची पुस्तके मराठीतून मिळणार

■ **संतोष मिठारी** : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत शिवाजी विद्यापीठाने चांगली आघाडी घेतली आहे. याअंतर्गत आता विद्यापीठाने विद्यार्थीहिताचे आणखी एक पाऊल टाकले आहे. अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तके विद्यापीठ स्वतः तयार करून देणार आहे. त्यातील बी. ए., बी. एस्सी.च्या चार अभ्यासक्रमांची दहा पुस्तके पुढील दोन आठवड्यांत उपलब्ध होणार आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना जास्तीतजास्त शैक्षणिक संसाधने उपलब्ध करून देण्यावर विद्यापीठाने अधिक लक्ष दिले आहे. दूरशिक्षण केंद्रात जे विद्यार्थी प्रवेशित होतात त्यांच्यासाठी स्वयंअध्ययन साहित्य म्हणून क्रमिक पुस्तके विद्यापीठ तयार करते आणि या विद्यार्थ्यांना दिली जातात. त्यात बी. ए., बी. कॉम., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी. मॅथमेटिक्स, एमबीए आदी अभ्यासक्रमांच्या पुस्तकांचा समावेश आहे. अभ्यासक्रम बदलल्यानंतर या पुस्तकांमध्ये त्याप्रमाणे सुधारणा केली जाते.

विद्यापीठाच्या एकूण विद्यार्थ्यांच्या तुलनेत दूरशिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांची संख्या दहा टक्के इतकी आहे. उर्वरित



> “ विविध अभ्यासक्रमांची क्रमिक पुस्तके तयार करण्याचा विद्यापीठाचा निर्णय अभिनव, ऐतिहासिक आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण देणारे आमचे शिक्षकच ही पुस्तके तयार करणार आहेत. त्यामुळे अभ्यासक्रमांत एकसूत्रता राखण्यास मदत होणार आहे. अभ्यासक्रमही अधिक समृद्ध होणार आहेत.
> **-डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

नव्वद टक्के विद्यार्थी संलग्नित महाविद्यालय, अधिविभागांत आहे. त्यांच्यासाठी विद्यापीठाच्या पुस्तके नव्हती. गेल्या दहा-वीस वर्षांत विद्यापीठाने जी पुस्तके प्रकाशित केली तीही तोकडी आहेत. या स्थितीमुळे विद्यार्थ्यांना खासगी प्रकाशकांची पुस्तके आधार ठरत आहेत. त्याचा विचार करून विद्यापीठाने या वर्षीपासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या निमित्ताने स्वतः क्रमिके पुस्तके तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याला अभ्यासमंडळाच्या सदस्यांनी साथ दिली. त्यानुसार विज्ञान विद्याशाखेची क्रमिक पुस्तके तयार करण्याचे पाऊल विद्यापीठाने टाकले. शैक्षणिक धोरणानुसार स्थानिक भाषांमध्ये विद्यार्थ्यांना पुस्तके विद्यापीठाकडून उपलब्ध करून दिली जाणार आहेत. विज्ञान, अभियांत्रिकी आणि वाणिज्य विद्याशाखेतील सर्व अभ्यासक्रमांची पुस्तके मराठीतून दिली जातील. त्याची सुरुवात 'वाणिज्य'पासून होणार आहे. या विद्याशाखेची इंग्रजीतील दोन पुस्तके मराठीत भाषांतर करण्याचे काम सध्या सुरू आहे.


### दहा पुस्तके दोन आठवड्यात बाजारात येणार

■ विद्यापीठाची बी. ए. मानसशास्त्र, बी. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स, केमिस्ट्री, स्टॅटेस्टिक्स या अभ्यासक्रमांची दहा क्रमिक पुस्तके लवकरच दोन आठवड्यांत बाजारात उपलब्ध होणार आहेत. या वर्षभरात विविध वीस अभ्यासक्रमांची पुस्तके विद्यापीठ तयार करणार आहे. अधिकार मंडळाच्या मान्यतेनंतर दूरशिक्षण केंद्रासाठी तयार केलेली सर्व पुस्तके नियमित अभ्यासक्रमासाठी उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

### दृष्टिक्षेपात...

- कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालय- २७६
- विद्यापीठातील अधिविभाग- ३४
- एकूण विद्यार्थी संख्या - सुमारे २ लाख ५० हजार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 SEP 2024
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी प्रा. डॉ. के. वाय. राजपुरे, आर. जी. सोनकवडे आदी.

# कौशल्य आधारित शिक्षणावर भर देण्याची गरज : डॉ. शिर्के

## भौतिकशास्त्र विभागात शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : शिक्षकांनी विद्यार्थ्यांना फक्त अभ्यासक्रम शिकवण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहावे. त्यांनी कौशल्य आधारित शिक्षणावर भर देण्याची गरज आहे, असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागात आयोजित शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रमात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यार्थी भवनमधील जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्यांनी निवृत्त प्रा. एम. बी. डोंगरे यांनी विद्यार्थिनींच्या वसतिगृहाच्या बांधकामासाठी साडेसहा लाख रुपयांची देणगी दिल्याचे सांगून या विभागाला दातृत्वाचा वारसा असल्याचे सांगितले. या कार्यक्रमात प्रा. बी. व्ही. खासबारदार यांनी पुरस्कृत केलेली निवृत्ती शिक्षकाची शिष्यवृत्ती आणि प्रा. सी. एच. भोसले यांनी आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कृत केलेली शिष्यवृत्ती सुबहान जमादार, प्रियांका पाटील, संपदा चव्हाण या विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आली. प्रा. डॉ. के. वाय. राजपुरे यांनी मनोगत व्यक्त केले. विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी गुरू-शिष्य परंपरेचे शाश्वत महत्त्व अधोरेखित केले. यावेळी डॉ. ए. व्ही. मोहोळकर, आर. एस. व्हटकर, डी. एच. भादले, एम. व्ही. टाकळे, एस. पी. दास, व्ही. एस. कुंभार, एस. एस. पाटील, एम. आर. वायकर, ए. आर. पाटील, उमेश भोसले, अभिजित लिंग्रस उपस्थित होते. उपकुलसचिव बी. एम. नाळे यांनी स्वागत केले. नेहा शहा, साक्षी काळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एन. एल. तरवाळ यांनी आभार मानले.

0 9 SEP 2024
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजोपयोगी संशोधन करण्याची गरज

## शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात आय.आय टी.मधील डॉ. पी.एम.शिरगे यांचे मत

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

बहुविद्याशाखीय शिक्षणामुळे संशोधनास गती मिळते. परंतू समाजोपयोगी संशोधन अतिशय महत्वाचे आहे, असे मत इंदोर येथील आय. आय. टी.मधील डॉ. पी. एम. शिरगे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागातील आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. "ऊर्जेसाठी प्रगत कार्यात्मक पदार्थ" हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे होते.



**कोल्हापूर : विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागात डॉ. पी. एम. शिरगे यांचा सत्कार करताना डॉ. आर. जी. सोनकवडे. सोबत डॉ. के. वाय. राजपुरे.**

डॉ. शिरगे म्हणाले, ऊर्जा साठवण, सुपरकंडक्टरमध्ये प्रगत कार्यात्मक पदार्थांचा उपयोग केला पाहिजे. सौर घट, बॅटरी, सुपरकॅपेसिटर आणि गॅस सेन्सर यांसारख्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये संशोधन मोठ्या प्रमाणात होत आहे. सुपरकंडक्टर्समधील त्यांचे कार्य, विशेषतः कमी तापमानात शून्य विद्युत प्रतिरोधक, चुंबकीय उत्सर्जन (मॅगलेव्ह) ट्रेन आणि क्वांटम संगणन यांसारख्या ॲप्लिकेशन्सच्या प्रगतीमध्ये निर्णायक ठरले आहे. सुपरकंडक्टर्सचे प्रमुख वैशिष्ट्य जे चुंबकीय क्षेत्रांना मागे टाकते, घर्षणरहित, ऊर्जा–कार्यक्षम वाहतुकीसाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी विविध गुणधर्मांसह नवीन पदार्थ विकसित केले आहेत. त्यांचे संशोधनातील महत्व सांगितले. प्रा. शिरगे यांचे हरित ऊर्जा, सुपरकंडक्टिंग मटेरियल आणि पुढच्या पिढीतील ऊर्जा साठवण प्रणालींमध्ये योगदान महत्वाचे आहे.

अध्यक्षस्थानावरून डॉ. सोनकवडे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थीदिखील संशोधन कार्यात भरारी घेऊ लागले आहेत. भारतात सध्या २३ आयआयटी असून प्रा. शिरगे हे एका आघाडीच्या आयआयटीमध्ये संशोधन करीत आहेत, ही अधिविभागासाठी अभिमानाची गोष्ट आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या परिस्थितीचा बाऊ करण्यापेक्षा धाडसी निर्णय घ्यायला शिकले पाहिजे. अपयशाची भिती न बाळगता जागतिक संधी मिळविण्यासाठी आत्मविश्वासाने पुढे यायला हवे, असे सांगितले. डॉ. के. वाय. राजपुरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. एस. पाटील यांनी आभार मानले.

यावेळी डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. एस. पी. दास, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. एम. आर. वाईकर, डॉ. ए. आर. पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 SEP 2024

तरूण भारत

# विद्यार्थ्यांनी चाणाक्षवृत्तीने संधीचा शोध घ्यावा

## डॉ. वर्षा मैंदर्गी : विद्यापीठात शिक्षक दिन, माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

**कोल्हापूर :** आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या वाढत्या प्रसाराच्या काळामध्ये शिक्षकांची जबाबदारी वाढली आहे. सध्याच्या या वेगाने बदलत्या काळात विद्यार्थ्यांनी चाणाक्षवृत्तीने उत्तम संधीचा शोध घेतला पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी केले. विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागामार्फत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन व माजी विद्यार्थी स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या.

यावेळी माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर विभागातील विद्यार्थ्यांचा विविध व्यावसायिक पात्रतेसाठी आवश्यक असलेल्या सेट, नेट, सिटेट, पीएचडी परीक्षांमधील यशाबद्दल मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन पल्लवी कांबळे, ऐश्वर्या मुरुथवर व नेहा लाटे यांनी केले. कार्यक्रमास शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. सुप्रिया पाटील, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, संगीता चंदनवाले आदी उपस्थित होते.